MHYA070015392020

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४२/२०२० मधील निशाणी क्र.१४ कडील अर्जावर आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ तर्फे दिवाणी प्रक्रीया संहिता क्रम १, नियम १०(२) मधील तरतुदीप्रमाणे सदर प्रतिवादीचे नाव वगळण्यासाठी दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. ५ ने प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुत प्रकरणात एच.ड.एफ.सी. बँकेला प्रतिवादी न करता शाखा व्यवस्थापक, एच.डी. एफ. सी. बँक यांना चुकीच्या तऱ्हेने प्रतिवादी केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ५ यांना अयोग्यरित्या सामील केले असल्यामुळे सदर दावा प्रतिवादी क्र. ५ विरुध्द समर्थनीय नाही. प्रतिवादी क्र. ५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने संपूर्ण दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ बँकेला या प्रकरणात सामील करण्याबाबत कोणतेही कारण नमूद केले नाही. तसेच वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ विरुध्द कोणतीही तक्रार उपस्थीत केली नाही. प्रतिवाद क्र. ५ यांनी प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, वादपत्राच्या टायटल क्लॉजमधुन प्रतिवादी क्र. ५ चे नाव वगळण्याचा आदेश व्हावा.

३) प्रस्तुत अर्जास वादीचे म्हणणे घेण्यात आले आहे. वादीतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी क्र. ५ हा महत्वाचा पक्षकार आहे. प्रतिवादी क्र. ५ यांच्याकडे प्रतिवादी

क्र. २ चे खाते आहे व सदर खात्यामध्ये वाद मालमत्तेच्या भुसंपादनाचा मोबदला जमा आहे. सदर दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी क्र. ५ विरुध्द मागणी केलेली आहे व त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र. ५ तर्फे विद्वान वकील श्री एम. डी. राजगुरे व वादीतर्फे विद्वान वकील श्री पी. व्ही. चौधरी यांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचा मालक असल्याचे करुन घोषीत मिळण्याकरीता व तसेच प्रतिवादी क्र. ५ यांच्याकडे जमा असलेली संपादीत जमीनीच्या मोबदल्याची रक्कम प्रतिवादी क्र. २ याने उचल करु नये याकरीता कायम मनाई हुकूम मिळण्याबाबत दाखल केला आहे. वादीच्या वादपत्रातील कथनानुसार प्रतिवादी क्र. २ यांचे प्रतिवादी क्र. ५ यांच्याकडे खाते आहे व सदर खात्यामध्ये संपादीत जमीनीच्या मोबदल्याची रक्कम जमा झाली आहे. प्रतिवादी क्र. ५ बँकेकडे वाद मालमत्तेच्या मोबदल्याची रक्कम जमा असल्यामुळे वादीने सदर प्रतिवादी क्र. ५ यांना या प्रकरणात प्रतिवादी म्हणुन सामील केले आहे. वादीने वादपत्राच्या विनंतीच्या परिच्छेदामध्ये अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. ५ याने प्रतिवादी क्र. २ यास वादीच्या हिस्स्याच्या ०.०७ आर क्षेत्रफळाच्या मोबदल्याची रक्कम देवु नये असा हुकूमनामा पारीत करुन मिळावा. वादीच्या वादपत्रातील कथनांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने प्रतिवादी क्र. ५

यांना या दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन का सामील केले आहे याचा सविस्तर तपशील नमूद केला आहे व तसेच वादपत्राच्या विनंतीच्या परिच्छेदामध्ये प्रतिवादी क्र. ५ विरुध्द मनाई हुकूमाची विनंती देखील केली आहे. वादीच्या वादपत्रातील कथने विचारात घेता व वादीची वादपत्रातील विनंती विचारात घेता व दाव्याचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ५ हा आवश्यक पक्षकार आहे. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.07.12 15:36:21 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १२/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, दारव्हा.

J.O.Code MH-00497